# T16/AGR211/EE/20160308

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उपप्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) पीक संरक्षणाची 'एकात्मिक व्यवस्थापन पद्धती' म्हणजे काय ? 5

ब) फुलकोबीच्या फायदेशीर लागवडीसाठी कशी जमीन असावी ? तसेच फुलकोबीच्या वाढीसाठी कोणते पोषक हवामान पाहिजे असते ? 5

क) नवलकोलच्या 'किंग ऑफ नार्थ' ह्या वाणाची वैशिष्ट्ये लिहा. 5

ड) ब्रोकोली हे पीक किती आंतरावर आणि कोणत्या पद्धतीने लावतात ? तसेच या पिकाला किती खते देतात ? 5

इ) भेंडी पिकामध्ये तणनियंत्रण कसे करतात याबाबत लिहा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) बटाट्याच्या 'कुफरी सिंदुरी' ह्या वाणाची वैशिष्ट्ये लिहा. 5

ब) कांदा बीजोत्पादनाची पद्धती थोडक्यात द्या. 5

क) महाराष्ट्रातील लसूण उत्पादन करणारे प्रमुख जिल्हे कोणते ? 5

ड) रताळ्याच्या पुसा सफेद या वाणाची वैशिष्ट्ये लिहा. 5

इ) गाजर पिकांमधील विकृती लिहा. त्यांच्या नियंत्रणाची उपाययोजना लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) मुळ्याच्या पुसा चेतकी या वाणाची वैशिष्ट्ये लिहा. 5

ब) शलगमची काढणी करतांना काय काळजी घ्यावी ? 5

क) सफेद मुसळीच्या काढणीच्या वेळी कोणती काळजी घ्यावी ? 5

ड) पालकावरील महत्त्वाच्या किडी कोणत्या ? त्यांचे नियंत्रण कसे करावे ? 5

इ) मेथीची लागवड कशी करतात ? त्यासाठी हेक्टरी किती बियाणे लागते ? ते लिहा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) धण्याची उगवण चांगली होण्यासाठी त्यांवर कोणती बीजप्रक्रिया करावी ? 5

ब) लेट्यूस या पिकाला खते किती प्रमाणात आणि केव्हा द्यावी ? 5

क) मशरूमचे निरनिराळे प्रकार लिहून प्रत्येकाच्या वाढीसाठी अनुकूल तापमान किती लागते ते लिहा ? 5

ड) बेबीकॉर्नचा दर्जा चांगला घेण्यासाठी कोणती काळजी घ्यावी ? 5

इ) झुकिनी पिकाचे उपयोग थोडक्यात लिहा. 5